Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भारतीय संस्कृतीची समताधिष्ठित समाजाच्या दिशेने वाटचाल

**डॉ. के.जी. सूर्यवंशी**
इतिहास विभाग प्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना

प्रस्तावना:

नानाविध धर्म, पंथ, संप्रदाय, समुदाय असलेल्या स्वतंत्र भारताच्या संविधानात धर्मनिरपेक्षता आणि सर्व धर्म समभाव ही दोन तत्व आधारभूत आहेत. त्यांच्यामुळे भारतातील विविधतेला एकतेच्या सूत्रात गुंफणे शक्य झाले आहे. नव्या स्वातंत्र्योत्तर सामाजिक पुनर्बांधणीला दिशा मिळाली. एकविसाव्या शतकात त्या दिशेने जाऊन भारतीय संस्कृती निश्चितच समताधिष्ठित समाज रचना सत्कार करेल यात शंका नाही. भारतीय संस्कृतीच्या गेल्या पाच हजार वर्षाच्या वाटचालीचे हे नवे वळण नक्कीच सम्यक दिशेने जाईल यात शंका नाही.

**धर्म निरपेक्षतेचे तत्व :-**

धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचे विविध अर्थ सांगितले जातात. शिक्षण, शासन, नितीनियम इत्यादी गोष्टी धर्मापासून स्वतंत्र असणे म्हणजे धर्मनिरपेक्षता (सेक्युरिझम) होय. असे ऑक्सफर्ड डिक्शनरीत म्हंटले आहे! मराठी विश्वकोशात तीन पातळ्या सांगितल्या आहेत.

(१) इतरांशी संबंध नसलेले व्यक्तिगत जीवनाचे क्षेत्र यात व्यक्तीने स्वत:पुरत्या पाळवयाच्या धार्मिक विधी निषेदाच्या संकल्पनेचा समावेश असतो.

(२) व्यक्ती आणि समाज यांचे संबंध या पातळीवर स्वतःचे धार्मिक विधी निषेध दुसऱ्यावर किंवा समाजावर नलादणे अभिप्रेत असते.

(३) शासनाचे धोरण ते ठरवितांना कोणत्याही धर्माचा किंवा धार्मिक विधी निषेधाचा प्राधान्य न देणे अपेक्षित असते.[२]

धर्म निरपेक्षतेचा एक पहिला उल्लेख बायबल ग्रंथात आढळतो. येशू ख्रिस्त म्हणतो सिझर (राजाचे) सिझरला द्या आणि देवाचे देवाला द्या. यावरून राजसत्ता आणि धर्मसत्ता भिन्न आहेत असे सूचित होते. राज सत्तेने सर्वांना समानतेने वागवावे. त्यांच्यामध्ये धर्मावरून भेदभाव करू नये, ही विचारसरणी म्हणजेच धर्मनिरपेक्षता तत्त्वाचे पालन करणे होय. इ.स. १८५० साली जॉर्ज जेकब होलीयोक यांनी प्रथम धर्मनिरपेक्षता तत्त्वाची चर्चा केली धर्म आणि धर्मनिरपेक्षता ही तत्वे परस्पर

विरोधी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. धर्मनिरपेक्षता म्हणजे नास्तिकता नवे हा स्वतंत्र शब्द प्रचलित आहे.

काही इंग्रजी शब्दकोशामध्ये सेक्युलर या शब्दाचा अर्थ एथिइस्ट असा सांगितला आहे. मराठीत सेक्युलर या शब्दाचा अर्थ अधर्मी, निधर्मी, धर्म निरपेक्षतावादी असा आहे. [३] जगामध्ये ढोबळ मानाने दोन प्रकारच्या राज्य पद्धती आढळतात. पहिली धर्माधिष्ठित राज्यपद्धती होय तिच्यात कुठल्या तरी धर्माचा किंवा धर्मतत्त्वांना अनुसरून राज्यकारभार केला जातो पाकिस्तान सारख्या काही देशाची राज्यपद्धती इस्लाम धर्माधिष्ठित आहे. तिच्यात कोणत्याही एका धर्माला केंद्रवर्ती ठेवले जात धर्मतत्त्वांऐवजी संविधानानुसार राज्यकारभार केला जातो. भारत अमेरिका सारख्या अनेक लोकशाहीवादी देशांमध्ये ही राज्यपद्धती प्रचलित आहे. [४]

**संविधान निर्मित धर्मनिरपेक्षता :-**

भारतीय संविधानाने देशातील सर्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे हा एक मूलभूत मानवी हक्क मानला गेला आहे. अनुच्छेद क्रमांक 25 ते 28 मध्ये त्याचे सविस्तर विवरण केले आहे. कोणतेही धर्मनिरपेक्षतावादी राज्यपद्धती धर्मविरोधी नसते तिच्यात प्रत्येक नागरिकाला हवा तो धर्म पाळण्याचे, स्वीकारण्याचे किंवा बदलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. प्रत्येक जण आपल्या मनाप्रमाणे उपासन करू शकतो. कोणाचेही धार्मिक स्वातंत्र्य राज्यकारभाराला बाधक ठरणार नाही हे पथ्य पाळले जाते. धर्माच्या दृष्टीने बहु संख्यांक आणि अल्पसंख्यांक असा भेदभाव केला जात नाही. या राज्यपद्धतीतील सामाजिक व सांस्कृतिक जीवनही धर्मनिरपेक्षतावादी असते. धर्माला समाज जीवनापासून आणि राजकीय व्यवहारापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले जाते. [५]

धर्मनिरपेक्षतेचे तत्व व्यक्तीच्या सर्वांगीण अभ्युदयावर लक्ष केंद्रित करते. त्यासाठी संविधानानुसार वेगवेगळे कायदे केले जातात. मात्र ते धार्मिक ते त्या पायावर आधारित नसतात. त्यांचा मुलाधार सामाजिक न्याय असतो. या तत्त्वानुसार विविध धर्म संस्थांना सामाजिक संस्थाचा दर्जा दिला जातो. तसेच एखादी धर्मसत्ता प्रबळ, किंवा देश विघातक होत असेल तर तिच्यावर प्रचलित कायद्यानुसार प्रतिबंध घातले जातात. [६]

भारतामध्ये मध्य युगापर्यंत सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी धर्म तत्त्वाचा आधार घेतला जात असे. सध्याच्या विज्ञान युगात कोणताही सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संख्याशास्त्र, शिक्षण शास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र इ. ची मदत घेतली जाते. यावरून धर्मनिरपेक्षतावादी तत्त्वानुसार धर्म तत्वे आणि सामाजिक प्रश्नाचे सविस्तर फारकात झाल्याचे आपणास आढळते. [७]

ग.बा. सरदार म्हणतात "धर्म हे लोकांचे अज्ञान व भाबडेपणा याचा फायदा उठवून काही धूर्त आणि कावेबाज लोकांनी उभे केलेले एक थोतांड आहे. आणि लोकांना शिकवून शहाणे केले की धर्म

संस्था अल्पावकाशात नष्ट होईल हे बुद्धी सामर्थ्यावर सर्वस्वी विसंबून राहणाऱ्या लोकांची धारणा चुकीची आहे. धर्म श्रद्धेचे आणि धर्मसंस्थेचे अधिष्ठान लोकांच्या मनात नसते तर समाजाच्या संस्थात्मक घडणीत आणि एकंदर जीवनातील वास्तव्य असते. समग्र क्रांतीची चळवळ यशस्वी होऊन सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात जेव्हा आमुलाग्र परिवर्तन होईल तेव्हा धर्मनिरपेक्षतेचे तत्व सहजपणे आणि सर्वत्र अंतर्भूत झालेले आहे असे दिसून येईल. [८]

**सर्वधर्म समभावाचे तत्त्व:-**

सर्वधर्म समभाव हा शब्द अगदी साधा सरळ अर्थाचा आहे. व्यक्ती, समाज आणि सरकार या घटकांनी सर्व धर्मांना सारख्याच भावनांनी पहावे. त्याचा सारखाच मान राखावा आणि सर्व धर्म सारखाच तोला मोलाचे आहेत असे मानावे म्हणजेच सर्व धर्म समभाव होय. धर्म ही मानवी इतिहासातील सदैव स्थीरपद राहिलेली संकल्पना आहे. वेगवेगळया काळात आणि देशात तिचे स्वरूप वेगवेगळे होते. धर्म हा माणसाने प्रकृतीला दिलेला प्रतिसाद आहे तिचे भव्य रुद्र आणि अनाकलणीय रूप अनुभवून माणसाला जय जे वाटेल ते धर्म म्हणून आकाराला आले. एखादी अलौकिक शक्ती संपूर्ण संपूर्ण विश्वाचे संचालन करते. हा विश्वास सर्व धर्माच्या मुळाशी आढळतो. प्रकृतीतील प्रत्येक घटकाला देव स्वरूप मानून त्याची पूजा करणे किंवा उपासना करणारे अनेक धार्मिक पंथ, उपपंथ, संप्रदाय जगभर आढळतात. [९]

जगातील इतर संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्व आहे. या संस्कृतीशी संबंधित हिंदू, जैन, बौद्ध, पारशी, शिख, मुस्लिम, ख्रिश्चन इत्यादी धर्म गुण्यागोविंदाने नांदत आले. त्यांच्यात इतिहासात काळात कलह, संघर्ष, मतभेद रक्तपात यासारख्या घटना झाल्या. पण याचबरोबर परस्परांचे परस्परांमध्ये विलिनीकरण ही होत गेले. एकमेकांनी एकमेकाची तत्व कळत नकळत स्वीकारली. त्यामुळे आपोआपच सर्वधर्म समभावाला चालना मिळत गेली आणि सर्व धर्मांनी भारतीय संस्कृतीच्या विकासाला मोलाचा हातभार लावला. [१०]

**समतेचे तत्व :-**

सामाजिक पुनर्बांधणीच्या दृष्टीने आपण धर्मनिरपेक्षतेचे आणि सर्वधर्म समभावाचे तत्व असे उपयुक्त होते. तसेच समतेचे तत्व देखील उपयुक्त आहे. जगातील सर्व माणसे जन्माने सारखी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात माणसांमध्ये लिंगभेद, बुद्धिभेद, जातिभेद, वंश भेद, आचार विचार भेद इत्यादी बाबतीत विषमता असते. तिच्यावर मात करून सर्व माणसांना समान संधी आणि अधिकार आहेत असे मानणे हे समतेचे मुख्य सूत्र आहे. ज्या देशांमध्ये विविधापूर्व समाज असतात म्हणजे जात, वंश, धर्म, लिंग, रंग, संपत्ती, बुद्धिमत्ता यांच्यात वेगवेगळापणा असतो. अशा परिस्थितीत माणसा माणसांमध्ये कोणत्याही कारणाने भेदभाव केला जात नाही. सर्वांना जीवन जगण्याचा आचार

विचाराचा अधिकार दिला जातो. तसेच माणसा माणसा मध्ये कृत्रिम भेद निर्माण करणारे अधिकार नष्ट केले जातात अशा समाजाला समताधिष्ठित समाज असे म्हणतात. [११]

समताधिष्ठित समाज आपोआप निर्माण नसतो. तो जाणीवपूर्वक निर्माण करावा लागतो.इ.स. १७८९ मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली तेथे ही मानवी हक्काचा जाहीरनामा तयार केला गेला यात माणसाचे स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तत्त्वाची घोषणा करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर भारतात भारतीय संविधानाने समतेचे तत्व अतिशय प्रभावीपणे प्रस्थापित केले आहे.[१२]

**समताधिष्ठित समाजरचनेच्या मार्गातील अडथळे :-**

भारतीय समाज रचनेचा इतिहास प्राचीन आणि गुंतागुंतीचा आहे. आजही रानावनात राहणारे आदिवासी समाज एकीकडे तर दुसरीकडे उच्च विद्या विभूषित तंत्रविज्ञाकुशल आणि गडगंज संपत्ती बाळगणारे वर्ग एकाच भारतात आहे. एकीकडे अलोट संपत्ती आणि दुसरीकडे कमालीची दारिद्र्य, पराकोटीची आध्यात्मिकता, चंगळवादी मानसिकता, ज्ञानाची विशाल मंदिरे दुसरीकडे विलक्षण अज्ञान, एकीकडे मोठे कारखाने दुसरीकडे साधे हस्त उद्योग नाही, कमालीची विषमता ही भारतीय समाजाचे ओळख झाली आहे. [१३] पाच हजार वर्षाच्या इतिहासात भारतात वर्ग, वंश, जाती, जमाती, सांस्कृतिक विशेष याचा सकर मोठ्या प्रमाणात झाला. फुटीरतावादी चळवळी या समताधिष्ठित समाज रचनेच्या मार्गातील फार मोठा अडथळा आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हाच पाकिस्तानचा जन्म झाला. भारताचे फाळणी हा भारतीय संस्कृती वरील फार मोठा आघात होता. त्याचे गाव अजूनही बुजलेले नाहीत. काश्मीर, पंजाब, आसाम, तामिळनाडू असे कितीतरी भाग देश विघातक फुटीरतावादी चळवळीच्या छायेत वावरत आहेत. सीमेवरून, पाण्यावरून, भाषेवरून किंवा नवीन राज्याच्या मागणीवरून संघर्ष करणाऱ्या चळवळी उभ्या राहतात. [१४]

समाजधिष्टीत समाज रचनेच्या मार्गातील प्रमुख पाच अडथळयांचा सामना भारताला करावा लागतो तो याप्रमाणे

१. उच्च वर्ण विरुद्ध कनिष्ठ वर्ण
२. श्रीमंत वर्ग विरुद्ध गरीब वर्ग
३. धार्मिक बहुसंख्यांक विरुद्ध दक्षिण भारत
४. उत्तर भारत विरुद्ध दक्षिण भारत
५. केंद्र सरकार विरुद्ध राज्य सरकार

**उच्च वर्णविरुद्ध कनिष्ठ वर्ण :-**

वर्ण व्यवस्था कालबाह्य झाली आणि तिचे रूपांतर चिवट अशा जातीव्यवस्थेत झाले तरी भारतीय समाजात आपल्या उच्च वर्णाचा, जातीचा, धर्माचा, अभिमान बाळगणारी माणसे मोठ्या प्रमाणात आढळतात. उच्चवर्णीय एकत्रित येऊन कनिष्ठ वर्नियाचे शोषण, दमन, अत्याचार करीत आहेत. जाती व्यवस्थेचा पगडा अजूनही माणसाच्या मनावर आहे आणि त्याचा स्पष्ट ठसा त्याच्या सामाजिक जाणीवावर आणि सांस्कृतीकरिती भातीवर दिसतो. शहरापेक्षा ग्रामीण भागात वर्ण वर्चस्वाची भावना अधिक आढळते. यातून सामाजिक हत्याकांडाचे लांच्छनास्पद प्रकार घडून येत असतात. [१५]

श्रीमंत वर्ग विरुद्ध गरीब वर्ग, धार्मिक अल्पसंख्यांक विरुद्ध धार्मिक बहुसंख्यांक, उत्तर भारत विरुद्ध दक्षिण भारत, केंद्र सरकार विरुद्ध राज्य सरकार अशा अनेक प्रश्नांना आज आपणास हैरान केले आहे. [१६]

विसाव्या शतकातील जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ व्यक्तित्व म्हणून सन्मान लाभलेले महात्मा गांधी हे आपल्या देशाचे राष्ट्रपिता आहेत. त्यांच्या धर्मविषयक धारणेतून विश्वधर्माच्या संकल्पनेचे उदात्त दर्शन घडते. ते कर्मकांड सांप्रदायिकतेला धर्म मनात नसतं, सर्वधर्म सारखेच पवित्र असून प्रत्येकाने स्वतःच्या धर्मात राहून सत्याचरण व सदाचाराने भौतिक व अध्यात्मिक उन्नती साधावी अशी त्यांची शिकवण होती.

त्यांच्या मते विश्वधर्म म्हणजे विश्वातील मानव जातीला मान्य होणारा धर्म होय. असा धर्म माणसाला एक उच्चत्तर विकशीनशील नैतिक जीवन जगण्याची सतत प्रेरणा केवळ भजन, पूजन, नाम कीर्तन यातून येत नसते. ती हृदयस्त चैतन्याच्या साक्षातकारातून जन्म घेते. आपल्या अंतरीक विकारावर विजय मिळवण्याच्या मार्गातील तो आटोकाठ प्रामाणिक प्रयत्न केलेले असतात. त्यावेळी माणसाचे नैतिक जीवन जगण्याची सुरुवात होते. धर्म हा समाज जीवनाचे केवळ एक अंग नसून तो संपूर्ण समाज जीवन उन्नत करणारे एक व्यापक तत्व आहे. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीची विश्व धर्माकडे वाटचाल महत्त्वपूर्ण ठरते.

भारताचा गेल्या पाच हजार वर्षाचा सांस्कृतिक वारसा किंवा संस्कृती संचित जगाला निश्चितच मार्गदर्शक ठरू शकेल. केवळ सर्वधर्म समभावाची भाषा बोलून, समतेची भाषा बोलून, बंधुत्वाची भाषा बोलून जर आपण कृती शून्य असू तर आपण फार काही करू शकलो असे मानता येत नाही. अज्ञानी लोकांना नाडणाऱ्या धार्मिक प्रकृतीवर कठोर आघात करावे लागतील, माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून जगातील सर्व धर्माचा यातील बऱ्या वाईट तत्त्वाचा तौलणीक अभ्यास करावा लागेल. या दृष्टीने विचारवंतांनी प्रयत्न चालवले पाहिजेत. मूलतत्त्व वाद्यांना लगाम घालावा

लागेल. धर्मातील दोष, उणिवा नष्ट कराव्या लागतील याच्यातच काळानुरूप आपणास परिवर्तन करावे लागेल.

**संदर्भसूची -**

१. क-हाडे बी. एम. - सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, पिंपळापुरे पब्लिकेशन नागपूर, २०११, पृष्ठ क्रमांक १८२
२. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक २१५
३. केतकर कुमार - कथा स्वातंत्र्याची, म.रा. पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ पुणे - १९८५, पृष्ठ क्रमांक ११०
४. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ११५
५. नाडगोंडे गुरुनाथ सामाजिक आंदोलने, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९८६, पृ. क्र. १२२
६. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक १२६
७. फडके य.दी - विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सहा मौज प्रकाशन, मुंबई, २००७, पृष्ठ क्रमांक २२१
८. उपरोक्त पृष्ठ क्रमांक २२४
९. बगाडे उमेश - महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्ग जाती प्रभुत्व, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पृष्ठ क्रमांक १७२
१०. उपरोक्त पृष्ठ क्रमांक १८६
११. लिमये मधु - स्वातंत्र्य चळवळीची विचारधारा, समाजवादी भीम बिरादरी प्रकाशन पुणे, २०१०, पृष्ठ क्रमांक २९८
१२. उपरोक्त पृष्ठ क्रमांक ३०६
१३. शहाघन श्याम ( अनुवाद - योगिनी वेंगुर्लेकर) सामाजिक चळवळी आणि सरकार, डायमंड प्रकाशन पब्लिकेशन पुणे, २००९, पृष्ठ क्रमांक ३१२
१४. उपरोक्त पृष्ठ क्रमांक ३१६
१५. र.मा. लोहार - आधुनिक भारत, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन सदाशिव पेठ पुणे, १९९१, पृष्ठ क्रमांक १२९
१६. जावडेकर श.द. - आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०, पुनर्मुद्रण १९९४, पृष्ठ क्रमांक २१६